!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९८ २४/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# झालाणी टुल्सच्या कामगारांना मोबदला मिळवून देणार

## शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचे कामगार शिष्टमंडळाला आश्वासन

## शिवसेना झालाणी टुल्सच्या ७०० कामगारांच्या पाठिशी

**संभाजीनगर (ता.२४) :** अठरा वर्षापूवी चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील झालाणी टुल्स इंडिया लिमिटेड कंपनीच्या कामगारांना २००२ साली न्यायालयाने एक लाख सत्तर हजार रुपयांचा मोबदला प्रत्येक कामगारांना देण्याचे आदेश दिले. परंतु अद्याप मोबदला मिळाला नसल्याने कामगारांच्या शिष्टमंडळाने खासदार चंद्रकांत खैरे यांची भेट घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली. शिवसेना प्रत्येक कामगारांच्या पाठिशी उभी असुन मोबदला मिळून देण्यासाठी पाठपुरावा करुन न्याय मिळवून देऊ असे आश्वासन खासदार चंद्रकांत खैरे यांनी झालाणीच्या कंपनीच्या कामगारांच्या शिष्टमंडळाला दिले.

सुभेदारी विश्रामगृह येथे झालाणी गृपच्या शिष्टमंडळाने त्यांच्या व्यथा खासदार चंद्रकांत खैरे यांच्यासमोर मांडल्या, काही कामगारांना ४४ टक्के पार्ट पमेंट कंपनीने ५०० कामगारांना दिले परंतु इतर कामगारांचे काय असा प्रश्न कामगारांना सतावतो आहे, त्यातील २०० कामगार मरण पावले आहेत, या सर्व व्यथा समजावुन घेत खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रिय कामगार मंत्री, केंद्रिय कामगार सचिव महाराष्ट्राचे कामगार मंत्री व एमआयडीसीच्या सचिवांशी या विषयी फोनवरुन चर्चा केली. कंपनी बंद पडल्यानंतर कंपनीच्या भुखंडाच्या विक्रीतुन कामगारांना पैसे देण्याचे आदेश असतांना आदेशाचे पालन का झाले नाही असा सवाल त्यांनी कामगार कल्याण अधिकाऱ्यांना उपस्थित केला. अधिवेशनाच्या काळात दिल्लीत केंद्रिय कामगार सचिवांकडे या प्रकरणी पाठपुरावा करुन कामगारांना न्याय मिळवून देऊ असे आश्वासन खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले.

या शिष्टमंडळात शिवाणी ठाकुर, एल. एम. म्हस्के, एम. एम. शेख, सुनिता कोकाटे, किरण कांबळे, नानासाहेब शिंदे, डि. के. सुरसे, के. के. ससाणे, आसाराम मुकादम, टि एन काथार, आर. एच. जिन्हासे, श्रीकांत मुळे, एच आय शेख, के. एस. कदम, व्हि. एस. निकम, एस. जोंधे, महोम्मद जमील, के. जी. म्हात्रे, ए एफ थोरात आदिंसह कामगार मोठ्या संख्येन उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525